**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक**
**पुणे महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक –**१३/१०/२०२३**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.९**
**ऑक्टोंबर २०२३**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार,दि.२०/१०/२०२३** रोजी **दुपारी ४.०० (चार)** वाजता **महापालिका आयुक्त कार्यालयात** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र. २०४**

**संदर्भ–** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२१७,दि.१/११/२०२२
७) मनपा ठराव क्र.२६८,दि.१/१२/२०२२
८) मनपा ठराव क्र.३०१,दि.२८/१२/२०२२
९) मनपा ठराव क्र.३६९,दि.१७/२/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१,दि.२६/४/२०२३
११) मनपा ठराव क्र.६७,दि.२०/६/२०२३

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी –२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन –२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती –१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |
| | | | पदोन्नती –७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | |

( टीप :– पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१२९,
दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२०५**

संदर्भ :- १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२
३) मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२५, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७०, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२६९, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७०, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.२, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६८, दि.२०/६/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सॅन ॲड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट X ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३०,
दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२०६**

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२६, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७१, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७०, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७१, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.३, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६९, दि.२०/६/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३१,
दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२०७**

संदर्भ :- १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२७, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७२, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७१, दि.१/१२/२०२२

७) मनपा ठराव क्र.३७२, दि.१७/२/२०२३

८) मनपा ठराव क्र.४, दि.२६/४/२०२३

९) मनपा ठराव क्र.७०,दि.२०/६/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३२, दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२०८**

संदर्भ :- १) मा. सौ. उज्ज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२

३) मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२

४) मनपा ठराव क्र.१२८, दि.२५/७/२०२२

५) मनपा ठराव क्र.१७३, दि.२३/९/२०२२

६) मनपा ठराव क्र.२७२, दि.१/१२/२०२२

७) मनपा ठराव क्र.३७३, दि.१७/२/२०२३

८) मनपा ठराव क्र.५, दि.२६/४/२०२३

९) मनपा ठराव क्र.७१, दि.२०/६/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३३, दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२०९**

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२

३) मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२

४) मनपा ठराव क्र.१२९, दि.२५/७/२०२२

५) मनपा ठराव क्र.१७४, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७३, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७४, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.६, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७२,दि.२०/६/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१–२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३४, दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२१०**

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/३३१, दि.२९/८/२०१९.
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/५८, दि.२९/४/२०२०.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २२०३, दि.१/०२/२०२२ रोजीचे पत्र.
४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडीलआ.क्र. एफएमओ/४६०, दि.२७/७/२०२० रोजीचे पत्र.
५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.३८४, दि. १०/७/२०२२ रोजीचे पत्र.
६) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४००, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०३, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
८) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०४, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
९) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६७, दि. २९/९/२०२० रोजीचे पत्र.
१०) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६९, दि. ३०/९/२०२० रोजीचे पत्र.
११) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८२, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१२) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८३, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१३) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०५, दि. ८/१०/२०२० रोजीचे पत्र.
१४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०९, दि. ९/१०/२०२० रोजीचे पत्र.
१५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७२७, दि. ३/१२/२०२० रोजीचे पत्र.
१६) महात्मा फुले मंडई क ार्यालयाकडील आ.क्र.१७४३, दि. २४/३/२०२२ रोजीचे पत्र.
१७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७४२, दि. २४/०३/२०२२ रोजीचे पत्र.
१८) दि. ३०/०९/२०२० व दि. ६/१०/२०२२ मा.अति.महापालिका आयुक्त (वि) व मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार.
१९) दि. १०/०७/२०२१ रोजी मा. महापालिका आयुक्त यांचे तोंडी आदेशानुसार.
२०) विधी विभाग, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र.१३३९, दि.१३/६/२०२२.
२१) मालमत्ता व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र. २१७९, दि.२३/०६/२०२२.
२२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मंडई/११ दि.१२/४/२०२३ चे पत्र.
२३) स्थायी समिती ठराव क्र.५२,दि.१७/४/२०२३
२४) मनपा ठराव क्र.४९, दि.२६/४/२०२३
२५) मनपा ठराव क्र.५१, दि.३०/५/२०२३
२६) मनपा ठराव क्र.७३, दि.२०/६/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मंडई विभागाकडील गाळ्यांचा करारनामा व नवीन मुल्यांकना नुसार भाडे वाढ करणेसाठी खालील बाबींस

मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) कोरोना काळामध्ये मंडई अथवा इतर सार्वजनिक ठिकाणावर संचार बंदी असल्याने व पर्यायाने व्यवसाय बंद असल्याने मंडई विभागाकडून पुणे शहरातील सर्व मंडई मधील गाळेधारकांचे त्यांचे मागणीनुसार दि.०१/४/२०२० ते ३१/३/२०२१ अखेर, भाडे माफ करणेस होईल तसेच मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद संदर्भ क्र.०२ चे ठरावान्वये दि.०१/४/२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने भाडे आकारणी करणेस.

२) नवीन मुल्यांकना नुसार मंडई विभागाकडे मा. मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त झालेल`गाळ्यांचे मासिक दर हे आता असलेल्या मासिक भाडे रकमेच्या अनुक्रमे ५,६,७ व ८ पटीने (टप्प्याने) असे खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे ४ वर्ष करणेस.

| अ.क्र. | वर्ष | भाडेवाढपट |
|---|---|---|
| १ | एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ | ५ |
| २ | एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ | ६ |
| ३ | एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ | ७ |
| ४ | एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ | ८ |

३) सन २०२१–२०२२ पासून पुढे ३० वर्ष मुदतीचा करारनामा पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळाधारकांसमवेत करणेस.

४) मुंबई क्राफर्ड मार्केटच्या धर्तीवर पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळ्यांचे बांधकाम व गाळा दुरूस्ती करणेस.

५) मंडई नियमावलीनुसार गाळेधारकांना भाजी विक्री व्यवसाय व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणे तसेच व्यवसायात बदल करणेबाबत परवानगी देणेस.

६) सन एप्रिल २०२५ पासून नव्याने मुल्यांकन करून भाडे निश्चित करून आकारणी करणेबाबत.

७) सन एप्रिल २०२५ साठी निश्चित झालेल्या भाडेदरात पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करणेस.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोंबर २०२३ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१३५, दि.२५/८/२०२३ चा झाला आहे. )

**विषय क्र.२११**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/५८५,दि.२७/९/२०२३ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६४०, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या कै. सुंदराबाई गणपत राउत दवाखाना केळेवाडी, कोथरूड, पुणे येथील १० बेड्सचे डायलेसिस युनिट पी.पी.पी. तत्वावर संयुक्त विद्यमाने चॅरिटेबल ट्रस्ट/स्वयंसेवी संस्था/खाजगी संस्था यांना १० वर्षे कराराने चालविणेस देणे ( टेंडर्स क्र.७ सन २०२३–२०२४ ) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार श्री.मिनर्व्हा हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१)** श्री.मिनर्व्हा हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर, स.नं.१३/१, इंगळे प्राईड, इंगळे कॉलनी, एनडीए रोड, शिवणे, पुणे–४११०२३ यांचेकडून कै. सुंदराबाई गणपत राउत दवाखाना केळेवाडी, कोथरूड, पुणे – ४११०३८ येथील मिळकतीमधील दुसऱ्या मजल्यावरील अंदाजे क्षेत्रफळ २००० चौ. फूट जागेमध्ये डायलेसिसचा संयुक्त प्रकल्प राबविणेस.

**२)** श्री.मिनर्व्हा हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर, स.नं.१३/१, इंगळे प्राईड, इंगळे कॉलनी, एनडीए रोड, शिवणे, पुणे–४११०२३ यांनी निविदेमध्ये डायलेसिस करिता विना कन्ज्युमेबल्स प्रती रूग्ण, प्रती डायलेसिस जीएसटी करासह रक्कम रूपये ३३४/– प्रमाणे दर आकारून डायलेसिस करणेस.

**३)** श्री.मिनर्व्हा हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर, स.नं.१३/१, इंगळे प्राईड, इंगळे कॉलनी, एनडीए रोड, शिवणे, पुणे–४११०२३ यांचेकडून सदर डायलेसिस प्रकल्प १० (दहा) वर्षे मुदतीच्या कराराने चालविण्याकरिता आवश्यक तो करार करणेस व सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**विषय क्र.२१२**

संदर्भ :- **१)** पुणे महानगरपालिकेकडे ओपन ॲक्सेसव्दारे वीज खरेदी करणे या प्रकल्पांतर्गत मे. महाप्रीत ( Mahapreit) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA) करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/kwh या दराने वीज खरेदी करण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. १९२, दि.२३/०५/२०२२ व मा. मुख्य सभा ठराव क्र. ६३, दि.१७/६/२०२२ अन्वये यापूर्वी घेण्यात आलेली मान्यतेचे ठराव.

**२)** दि.११ एप्रिल २०२२ रोजीची महाराष्ट्र शासन, उद्योगउर्जा व कामगार विभाग बैठक -२०२१/प्र.क्र. २६७/ऊर्जा-७ च्या दर व कालावधी बाबतचा शासन निर्णय.

**३)** दि.१० जुलै २०२३ रोजीचे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. २०२२/प्र.क्र.२९/महामंडळे

**४)** मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/५७०,दि.२७/९/२०२३ चे पत्र.

**५)** मा.स्थायी समिती ठराव क्र.६४३, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण ५ मधील कलम (२) (२) मधील तरतुदीच्या आणि महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील दि.१० जुलै २०२३ रोजीचे शासन निर्णय क्र. २०२२/प्र.क्र.२९/ महामंडळे नुसार महाप्रीत या शासकीय संस्थेबरोबर G to G पद्धतीने ओपन ॲक्सेसद्वारे दि.११ एप्रिल २०२२ च्या महाराष्ट्र शासन दर आणि कालावधी नुसार म्हणजेच २५ वर्षापर्यंत र.रू. २.८२ या दराने वीज खरेदी करणे या प्रकल्पांतर्गत मे. महाप्रीत (Mahapreit) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA) करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/kwh या दराऐवजी २५ वर्षापर्यंत र.रू.२.८२/kwh या दराने वीज खरेदी करण्याच्या फेर प्रस्तावास व खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**१)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण ५ मधील कलम (२) २ मधील तरतुदीच्या आणि महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील दि.१० जुलै २०२३ रोजीचे शासन निर्णय क्र. २०२२/प्र.क्र.२९/महामंडळे नुसार महात्मा फुले नविनिकरणीय उर्जा व पायाभूत प्राधौगिक मे. महाप्रीत (Mahapreit ) या शासकीय संस्थेबरोबर G to G पद्धतीने ओपन ॲक्सेसद्वारे दि.११ एप्रिल २०२२ च्या महाराष्ट्र शासन दर आणि कालावधी नुसार वीज खरेदी करणेस.

**२)** मा. स्थायी समिती ठराव क्र. १९२, दि. २३/०५/२०२२ व मा.मुख्य सभा ठराव क्र.६३,दि.१७/०६/२०२२ अन्वये घेण्यात आलेल्या मान्यतेमधील कालावधी व दरात बदल करणे म्हणजेच पुणे महानगरपालिकेकडे ओपन ॲक्सेसद्वारे पॉवर खरेदी करणे या प्रकल्पांतर्गत मे.महाप्रीत (Mahapreit) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA) करण्यास ज्यामध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/kwh या दराऐवजी २५ वर्षापर्यंत र.रू. २.८२/kwh या दराने वीज खरेदी करणेस.

**३)** मा. स्थायी समिती ठराव क्र. १९२, दि. २३/०५/२०२२ व मा.मुख्य सभा ठराव क्र.६३,दि.१७/०६/२०२२ अन्वये घेण्यात आलेल्या मान्यतेमधील मुद्दा क्र. २ व ३ कायम ठेवणेस म्हणजेच ओपन ॲक्सेसद्वारे पॉवर खरेदी करण्यासाठी मे.महाप्रीत (Mahapreit ) या शासकीय संस्थेसोबत SPV स्थापित करणेस व SPV मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे, मनपा यांना देणेस व सदर SPV साठी Share Holder Agreement करणेस.

**विषय क्र.२१३**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/३७९,दि.३०/०८/२०२३

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/५७२,दि.२७/९/२०२३ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५४, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा हॉट मिक्स प्लांटकरिता डांबरी (व्ही.जी ३०/४० ग्रेड) एल.डि.ओ इमल्शन आर. एस.-। आर. एस.-।। महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये खरेदी करणेत आलेली असून खालील बाबी मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये डांबर व्ही. जी. ३०/४० ग्रेड एल. डी. ओ. मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो. ली. व मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. ली. यांचेकडे भरणा केलेली रक्कम.

* डांबर ( व्ही. जी. ३०/४० ग्रेड ) र. रू. २,९९,९९,३३८=२

* एल. डी. ओ. – र. रू. १,४९,९९,३३४/-

२) Emulshan RS- I व Emulshan RS-II मे. हिंदुस्थान कोलास कंपनी यांचेकडे भरणा केलेली रक्कम.

* Emulshan RS- I – र. रू. २९,९९,९५२=३६

* Emulshan RS-II – र. रू. १९,९९,८०५=५०

३) मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो. ली., मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. ली. व मे. हिंदुस्थान कोलास प्रा. ली. या तिन्ही कंपन्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार अग्रिम (advance ) रक्कम चेक/आर. टी. जी. एस. स्वरूपात सन २०२३-२४ अंदाजपत्रकातील बजेट कोड क्र. SE15A106 ( विशेष कार्याधिकारी पथ ) या अर्थशीर्षकामधून र.रू.५ कोटी अदा केलेली आहे.

**विषय क्र.२१४**

संदर्भ :- १) मुख्य लेखा व वित्त विभागाकडील इतिवृत्त जा.क्र. ९९५, दि.३१/०५/२०२३.

२) मुख्य अभियंता प्रकल्प कार्यालय जा.क्र. १५०५, दि. १८.०७.२०२३ रोजीचे पत्र.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.५/५७३, दि. २७/९/२०२३ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५५, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये मास्टर प्लॅननुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे (बजेट कोड-ZE16B102/D2-369) या कामाचे बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रात प्रभाग क्र.३७ येथे ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी र.रू.१.१० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक,<br>मा. अधिक्षक अभियंता, मलनिःस्सारण विभाग (प्रकल्प), पुणे महानगरपालिका(बजेट कोड -ZE16B102/D2-369)<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट भागांमध्ये मास्टर प्लॅननुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे . | र.रू. १.१० कोटी | --- |
| नवीन सुचविलेली कामे -<br>मा. उप आयुक्त परिमंडळ विभाग क्र.५ , पुणे महानगरपालिका | | |
| १) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-१ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| २) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-४ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ३) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-६ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ४) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-१२ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ५) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-१३ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ६) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-१६ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ७) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-२८ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ८) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-३० येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ९)प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी-३२ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १०) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी–३३ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |
| ११) प्र. क्र. ३७ मधील अप्पर इंदिरानगर बिबवेवाडी मधील चाळ क्र. बी–३५ येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे . | --- | १०.०० लक्ष |

**विषय क्र.२१५**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/५७४,दि.२७/९/२०२३ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५६, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाच्या १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये गणेशोत्सव २०२३ साठी फिरते विसर्जन हौद पुरविणे व पावित्र्य राखून गणेश मूर्ती संकलन व तदनुषंगिक कामे करणे या कामाकरिता कमी पडणारी रक्कम.रू. ०.३० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस व खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक,<br>घनकचरा व्यवस्थापन पुणे महानगरपालिका,<br>१) गणपती उत्सवासाठी अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणे.<br>बजेट कोड नं. RE19A159 | र.रू. ०.१०कोटी | --- |
| २) घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी प्राथमिक वाहतुकीसाठी गाड्या आऊटसोर्स तत्वावर (मनपा/ठेकेदाराकडील) चालविणे .<br>बजेट कोड नं. RE19A149 | र.रू. ०.२०कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम –<br>घनकचरा व्यवस्थापन पुणे महानगरपालिका,<br>गणपती उत्सवासाठी आवश्यक कामे करणे बजेट कोड नं. RE19A161 | --- | र.रू.०.३०कोटी |

१) घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्ता अ मधील शिल्लक राहणाऱ्या तरतुदीमधून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्ता ब मधील आवश्यक र.रू. ३०,००,०००/– (अक्षरी र.रू.तीस लक्ष फक्त ) वर्गीकरणाने उपलब्ध होणेस,

२) निविदेतील प्राप्त दर व सदर कामासाठी मा. स्थायी समितीची मान्यता मिळालेनंतर सदर कामाच्या रक्कमेध्ये अल्प फेरफार झाल्यास त्यानुसार आवश्यक तरतूद उपलब्ध करून देणेस मा. महापालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस.

**विषय क्र.२१६**

संदर्भ :- १) मा.वित्तीय समिती बैठक दि.२२/०५/२०२३ चे इतिवृत्त जा.क्र.९१८, दि.२९/५/२०२३

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.२/५७५, दि.२७/९/२०२३ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५७, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.७ मध्ये शिवाजीनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे कामी र.रू. १० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक,<br>शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय, पान क्र. – ४२,<br>बजेट कोड नं. ZE16B102/D2-369<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांमध्ये मास्टर प्लान नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे. | र.रू. १० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम<br>शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय<br>प्रभाग क्र.७ मध्ये शिवाजीनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | र.रू. १० लक्ष |

**<u>विषय क्र.२१७</u>**

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र.मआ/द/८६६,दिनांक १७/०९/२०२० अन्वयेचे कार्यालयीन आदेश .

२) मा.तांत्रिक छाननी समिती मान्यता ठराव क्र.७०,दिनांक –२०/०६/२०२३.

३) मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग यांना जा.क्र.२३९६, दिनांक २०/०६/२०२३ रोजी दिलेले पत्र.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पा.पु/५७८, दि. २७/९/२०२३ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.६५९, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या लोहगाव व वाघोली या गावांमध्ये समान पाणी पुरवठा करणे या कामाचे खर्चाचे दायित्व पत्करणे करिता महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब नुसार खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या लोहगाव व वाघोली या गावांमध्ये समान पाणी पुरवठा करणे या कामासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७२ ब प्रमाणे र.रू. २३० कोटी आर्थिक तरतूद करणेस.

२) सदर कामासाठी सन २०२४–२५, २०२५–२६ व २०२६–२०२७ या आर्थिक वर्षात टप्प्याटप्याने तरतूद करणेस .

**<u>विषय क्र.२१८</u>**

संदर्भ :- १) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७१, दि. २७/०२/२०१९.

२) मा.मुख्य सभा ठराव क्र.११९०, दि. ७/३/२०१९

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन /५७९,दि.२७/९/२०२३ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.६६०, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा प्रस्ताव लक्षात घेता मा. विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १५ व १६ पुणे या दोन कार्यालयाच्या कार्यकालाची मुदत पुढील पाच वर्षासाठी म्हणजेच दि. १/४/२०२४ पासून दि. ३१/३/२०२९ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने पुणे महानगरपालिकेकडील भूसंपादन व व्यवस्थापन कार्यालयाकडे कार्यरत असलेल्या विशेष भूमीसंपादन अधिकारी क्र.१५ व १६ पुणे यांचे कार्यकालाची मुदत वाढविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.२१९</u>**

संदर्भ :- १) मा. स्थायी समिती ठराव क्र.२२६, दि.३०/०५/२०२३.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५८०,दि..२७/९/२०२३ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६६१, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरूपात सर्व प्रकारची औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणे (RE17F133A औषधे खरेदी बल्क पद्धतीने मनपा सभासदांसाठी, मनपा सेवकांसाठी, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनांसाठी इत्यादी ) कामी र.रू. ४ कोटी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक,<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,CE17A242/SJ6-93<br>भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, | र.रू. ४ कोटी | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका<br>७ रूग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये इ. RE17F133A | | |

| | | |
|---|---|---|
| औषधे खरेदीः ( बल्क पद्धतीने मनपा सभासदांसाठी, मनपा सेवकांसाठी, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनांसाठी इत्यादी ) | --- | र.रू. ४ कोटी |

**विषय क्र.२२०**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/५८१, दि.२७/९/२०२३ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६६२, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक 'अ'चे रक्कम रूपये ६६,४८,००,००,०००/-व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रूपये १९,४४,००,००,०००/-असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रूपये ८५,९२,००,००,०००/- चे अंदाजपत्रकास मा. मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाची तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमा खर्चास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**अंदाजपत्रक 'अ'**

**जमाबाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल २०२२ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०२२ - २३ मधील जमा | ६१,४०,०१,१७,७५५ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ६१,४०,०२,१७,७५५ |

**खर्चबाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०२२ - २३ मधील खर्च | ५६,८३,०९,९७,०७९ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | ५६,८३,१०,९७,०७९ |
| ४ | वर्षात येणारी शिल्लक | ४,५६,९१,२०,६७६ |
| ५ | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम ( २०२२-२३ मधील अप्रत्यक्ष खर्च ) | ३४,८०,००,००० |
| ६ | अंदाजपत्रकाची **'अ'** ची सन २०२२-२३ ची एकूण शिल्लक | ४,२२,११,२०,६७६ |

**अंदाजपत्रक 'क'**

**जमाबाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल २०२२ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०२२ - २३ मधील जमा | १०,२९,५०,५४,०९० |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | १०,२९,५१,५४,०९० |

**खर्चबाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०२२ - २३ मधील खर्च | २२,४०,९५,४५,८२० |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | २२,४०,९६,४५,८२० |
| ४ | अंदाजपत्रकाची **'क'** ची सन २०२२ - २३ ची तूट | १२,११,४४,९१,७३० |

| | | |
|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकाची **अ** ची सन २०२२-२३ ची शिल्लक | ४,२२,११,२०,६७६ |
| २ | अंदाजपत्रकाची **क** ची सन २०२२ -२३ ची तूट | १२,११,४४,९१,७३० |
| ३ | अंदाजपत्रकाची **अ** व **क** ची सन २०२२-२३ ची तूट | ७,८९,३३,७१,०५४ |

सन २०२२ - २३ चे हिशोबामध्ये रक्कम रूपये ७,८९,३३,७१,०५४ इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भांडवली निधी | ७,८९,३३,७१,०५४ |
| | एकूण | ७,८९,३३,७१,०५४ |

**<u>विषय क्र.२२१</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन /५८२, दि. २७/९/२०२३ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६६३, दि.६/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे शहरामधील विविध नाट्यगृह व क्रीडा संकुले यांच्या दुरूस्ती विषयक कामे करणेसाठी र.रू. ५०० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक, भवन रचना विभाग,<br>पुणे महानगरपालिका, CE17A242/SJ6-93<br>भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, | ५०० लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u><br>भवन विभाग, पुणे महानगरपालिका<br>१) पुणे शहरातील विविध नाट्यगृह व सांस्कृतिक केंद्र येथील अस्तित्वातील खुर्च्यांची दुरूस्ती करणे, नवीन खुर्च्या व कार्पेट पुरवणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १,३६,०३,१३४/- |
| २) पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर व पं.जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन व आर्ट गॅलरी येथील स्थापत्यविषयक व तदनुषंगिक कामे करणे | --- | ७५,००,०००/- |
| ३) पुणे शहरातील विविध नाट्यगृह येथील स्थापत्यविषयक व तदनुषंगिक कामे करणे | --- | ४२,२४,८८४/- |
| ४) गणेश कला व क्रीडा मंदिर येथे स्थापत्यविषयक व तदनुषंगिक कामे करणे | --- | ९८,००,०००/- |
| **एकूण रक्कम अ** | | **३,५१,२८,०१८/-** |
| **विद्युत विभाग** | | |
| १) पुणे मनपाच्या परिमंडळ क्र.२ मध्ये असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे स्टेज,लाईट, स्टेज, ड्रेपरी, ऑडिओ सिस्टिम विषयक कामे करणे. | --- | ३७,९९,०९२/- |
| २) पुणे महानगरपालिकेच्या कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये अत्यावश्यक विद्युतविषयक कामे करणे. | --- | १६,१०,५९६/- |
| ३) यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे सीसीटीव्ही यंत्रणा पुरविणे, बसवणे व चालू करून देणे. | --- | ७,७३,९१६/- |
| ४) पुणे मनपाचे बालगंधर्व नाट्यगृह मध्ये चिलर एअर कंडीशन प्लांटची दुरूस्तीची कामे व विद्युत विषयक कामे करणे. | --- | ३०,००,०००/- |
